# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार )

जा.क्र. ८२३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/१२/२०१६

**१) मोटार सायकल चालकाने बैलगाडीला मागेहुन धडक देवुन स्वतः व मागे बसणाऱ्या इसमास जखमी केले. :—**

दिनांक १४/१२/२०१६ रोजी १९.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे चालवुन सिहोरा येथुन सिंदपुरी येथे राज्यमार्गाने जात असलेल्या बैलगाडीला मागेहुन धडक मारुन स्वत: व मागे बसलेल्या इसमास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी रामप्रकाश गणपत निकुळे वय ३२ वर्ष रा. सिंदपुरी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. लिल्हारे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**२) मोटार सायकल चालकाने एसटी बसला समोरुन धडक देवुन स्वतः व मागे बसणाऱ्या इसमास जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १५/१२/२०१६ रोजी १८.०० वा. दर. यातील फिर्यादी दिनेशकुमार धनराज झाडे वय ३२ वर्ष रा. मुंडीकोटा ता. तिरोडा हा आपली एसटी बस क्र. एमएच ४० वाय ५८९६ ही भंडारा कडुन तुमसर कडे जात असतांनी यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल आडवी तिडवी चालवत आणुन बसचे समोर उजव्या बाजुला धडक दिल्याने मोटार सायकलवर बसलेले इसम राधेश्याम टाळे रा. दहेगाव, विलास शेन्डे रा. मोहगाव देवी हे रोडचे खाली पडुन जखमी होऊन व स्वत: जखमी होऊन होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गेडाम पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**३) चिमुरडयाचा विहिरीचे पाण्यात बुडुन मृत्यु. :—**

दिंनाक. १५/१२/२०१६ रोजी ०९.०० वा. दर. यातील मृतक अर्पीत मच्छींद्र कासवकर वय दीड वर्ष, हा आपल्या घरासमोरील अंगणात खेळत असतांना अंगणातील जमीनीला समानतर असलेल्या विहरीमध्ये पडुन बुडुन मरण पावल्याने फिर्यादी प्रमोद ईश्वर कासवकर वय ३२ वर्ष रा. सुरेवाडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पो. स्टे. कारधा हे करीत आहे.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक १५/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ९३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती १४ केसेस, अवैध प्रवासी ०६ व ईतर वाहनांवरती ७३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.